<u>सं. फौ. ख. क्र.४०/२०१७</u> निशाणी क्र.५०

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – चंद्रकला शेषराव वानखडे

वय – अंदाजे ७० वर्षे, व्यवसाय – शेती

पत्ता – रा. गायगाव, ता. बाळापूर, जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचे मार्फत सरतपास दुपारी ०१.३५ वाजता सुरुः</u>**

१. फिर्यादी रत्ना सुनिल वानखडे ही माझी सुन आहे. दि.२७.१२.२०१६ रोजी दुपारी ०१ ते १.३० दरम्यानची आहे. माझी सुन रत्ना मसनवाट्यात इंधन काढण्यासाठी गेली होती. आरोपी रामदास दारु पिवून माझ्या सुनेच्या मागे गेला होता. तो माझ्या सुनेला असे म्हणाला की, 'तुला इंधन काढून देतो'. त्यावेळी रत्ना अशी म्हणाली की, 'तु मला इंधन काढून देवू नको, तु घरी जाय.' त्यावेळी तो रत्नाला असे म्हणाला की, ''मला तुझ्या सोबत काम करु दे.'' त्यानंतर त्याने रत्नाच्या मागे जावून तिचे दोन्ही हात पकडले त्यावेळी तिने त्याला झटका दिला व तेथून पळत घरी आली. घरी आल्यावर रत्ना मला अशी म्हणाली की, माझ्यासोबत उरळ पोलीस स्टेशनला चला. या सर्व बाबी मला माझी सुन रत्ना वानखडे हिने सांगितल्या होत्या. त्यानंतर पोलीस स्टेशन, उरळ येथे रिपोर्ट दाखल केला होता. रिपोर्ट दिल्यानंतर पोलीस चौकशी करण्यासाठी आले होते. पोलीसांनी माझ्याकडे घटनेविषयी चौकशी केली होती. मी सांगितल्याप्रमाणे माझे बयाण पोलीसांनी नोंदवून घेतले होते.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. आर. पटोकार यांचे मार्फत सुरुः</u>**

२. रत्नाच्या पतीचे नाव सुनिल असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, गायगावमध्ये कामधंदा उपलब्ध नसल्यामुळे सुनिल पंजाब राज्यामध्ये अनेकवेळा कामासाठी जात असतो. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा सुनिल आणि सुन रत्ना हे दोघेही ६–६ महिन्यांसाठी पंजाब येथे राहतात. हे म्हणणे खरे आहे की, गायगाव गावामध्ये मी आणि माझे

पती दोघेच राहतो. हे म्हणणे खरे नाही की, माझा मुलगा सुनिल आणि सुन रत्ना हे दोघेही घटनेच्यावेळी पंजाब येथे होते. मी स्वतःहुन सांगते की, घटनेच्यावेळी ते दोघेही येथेच होते, घटना घडल्यानंतर पोलीस स्टेशनला रिपोर्ट देवून पंजाबला गेले होते. रिपोर्ट दिल्यानंतर ३ हप्ते ते एक महिन्यानंतर माझा मुलगा सुनिल आणि रत्ना पंजाब येथे गेले होते. रत्ना तिच्या भावासोबत पंजाबला गेली होती.

३. आरोपी आणि गुन्हेगार या शब्दांचा अर्थ मला समजत नाही. यापुर्वी आरोपी या शब्दाचा मी वापर केला नाही. घटनेच्या दिवशी माझी सुन दुपारी १ ते १.३० वा. चे दरम्यान घरी आली होती. घडलेली घटना माझ्या सुनेने मला २ मिनीटांत सांगितली. त्यानंतर उरळ पोलीस स्टेशन येथे जाण्यासाठी आम्हाला २ घंटे लागले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस स्टेशन मध्ये गेल्यावर पोलीसांनी मला घटनेविषयी विचारपुस केली आणि त्याप्रमाणे लिहून घेतले. मी स्वतःहुन सांगते की, पोलीसांनी रत्नाला बोलाविले होते आणि तिच्याकडे विचारपुस केली होती.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | असे काही घडले का की तुम्ही पोलीस स्टेशनमध्ये रिपोर्ट देण्यासाठी गेल्या होत्या तेव्हा पोलीसांनी तुमच्याकडे कोणतीही चौकशी केली नाही ? |
| **उत्तरः** | रिपोर्ट रत्नाने दिला होता, पोलीस माझ्याकडे कशाला चौकशी करतील, मी बाहेर बसले होते. |

४. सुनेसोबत घडलेल्या घटनेविषयी पोलीसांना सांगणे मला गरजेचे वाटले होते, त्यामुळे पोलीसांना घटनेविषयी सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्यावेळेस पोलीस स्टेशनला गेलो होतो, त्यावेळी आरोपी रामदास पोलीस स्टेशनमध्ये कोंडलेला होता. मी स्वतःहुन सांगते की, त्याच्या हाताला दोरी बांधलेली होती.

**मध्यान्हाची वेळ झाली असल्यामुळे दुपारी ०२.०० वाजता उलटतपास तहकुब करण्यात येत आहे.**

**दिनांक : २१/०१/२०२५.**
**ठिकाणः बाळापूर**

**( विष्णु द. गिते )**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

**मध्यान्हानंतर उलटतपास शपथेवर दुपारी ०३.५० वाजता पुढे सुरु करण्यात येत आहे.**

५. पोलीस स्टेशन मध्ये रिपोर्ट लिहून घेण्यासाठी अर्धा घंटा वेळ लागला होता. रिपोर्ट दिल्यानंतर माझी सुन रत्ना हिला तपासणीकरीता पोलीसांनी उरळ येथील सरकारी दवाखान्यात नेले होते. पुन्हा घरी येण्यासाठी अंदाजे किती वेळ लागला हे सांगता येत नाही, परंतु घरी येण्यासाठी उशीर झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी आणि माझी सुन रत्ना आम्ही दोघीही हातामध्ये काचेच्या बांगड्या घालतो.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुम्ही सांगितल्याप्रमाणे तथाकथित घटनेत आरोपीने तुमच्या सुनेचा हात धरला त्यावेळी तिच्या हातातील बांगड्या फुटल्या होत्या का ? |
| **उत्तरः** | बांगड्याचे मला सुनेने सांगितले नाही. |

६. माझी सुन घरी पळत आली त्यावेळी लोकांनी तिला पाहिले होते किंवा नाही, हे मी पाहिले नाही. गावामध्ये, आमच्या घराच्या शेजारी/जवळ राहणाऱ्या लोकांसोबत आमची कोणतीही दुश्मनी नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी मला आजी म्हणतो आणि माझ्या पतीला आजोबा म्हणतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी सुन रत्ना ही आरोपीची नात्याने काकू लागते.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | घटनेपुर्वी रामदासच्या पत्नीच्या पत्नीसोबत तुमच्या कुटुंबाचे संबंध कसे होते ? |
| **उत्तरः** | आमचे त्यांच्यासोबत कोणतेही संबंध नाहीत. |

७. हे म्हणणे खरे आहे की, घटना घटल्यापासून ते माझी सुन रत्ना हिला तिचा भाऊ पंजाबला नेवून सोडले तो पर्यंतच्या काळामध्ये माझा मुलगा सुनिल हा गायगाव येथे आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझे बयाण हे त्यांच्या हस्ताक्षरात लिहून घेतले होते. माझे शिक्षण झालेले नसून मी अंगठा करते, मला सही करता येत नाही. मला वाचता आणि लिहीता येत नाही. माझ्या बयाणामध्ये काय लिहून घेतले आहे, हे मला वाचता येत नाही.

८. हे म्हणणे खरे आहे की, गावामध्ये मी, माझे पती, आणि सुन रत्ना आणि तिची मुले इ. सर्वजण कोणतेही कामासाठी जात नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझा मुलगा सुनिल दरमहीन्याल्या आम्हाला पैसे पाठवितो. गावामधुन आम्हाला कोणत्याही

व्यक्तीकडून पैसे किंवा इतर वस्तू उधार घेण्याची गरज भासत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला गरज पडली होती म्हणून मी रामदासकडे रु.२५,०००/– उसणे मागितले होते. हे म्हणणे खरे नाही की, रामदासने मला रु.२५,०००/– उसणे दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, घेतलेले पैसे परत देण्यासाठी मी टाळाटाळ करीत होते. मी स्वतःहुन सांगते की, आम्ही कधीही त्याच्याकडून पैसे उसणे घेतलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी तगादा लावत होता म्हणून मी माझ्या सुनेला पुढे करुन आरोपी विरुध्द खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीला प्रकरण मागे घेण्यासाठी रु.१५,०००/– ची मागणी केली होती. ज्या वेळी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला होता त्यावेळी झाकट (अंधार) पडली होती.

९. माझ्या सुनेला तिच्या भावाने पंजाबला नेवून सोडल्यानंतर पुन्हा २ ते ४ महिन्याने सुन पुन्हा घरी आली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सुनेसोबत घडलेली घटना माझ्या पतीला माहित आहे. स्वतःहुन सांगते की, बुढ्याला ऐकू येत नाही, त्यांना माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सुनेने यापुर्वी अशाच प्रकारचा रिपोर्ट इतर लोकांविरुध्द दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, इतर लोकांविरुध्द अशाच प्रकारचा रिपोर्ट देवून त्यांच्याकडून पैसे घेवून ते प्रकरण आपसात मिटविले होते. हे म्हणणे खरे आहे की, गायगाव या गावाची लोकसंख्या अंदाजे १५ ते २० हजार आहे.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुमच्या गावात रामदास रघुनाथ वानखडे नावाचे अजून तिन व्यक्ती राहतात ते तुम्हाला माहित आहेत का ? |
| **उत्तरः** | मी फक्त यालाच ओळखते बाकीच्यांना ओळखत नाही. |

१०. मला एक नातू आणि दोन नाती आहेत. नातू आणि नातीकडे पोलीसांनी घटनेविषयी कोणतीही चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गायगावामध्ये पुरुषांची आणि स्त्रीयांची वेगवेगळी गोदरी आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुरुषांच्या गोदरीमध्ये बाया जात नाहीत आणि बायांच्या गोदरीमध्ये पुरुष जात नाहीत.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | आरोपीचे ते पैसे परत दिले का ? |
| **उत्तरः** | आम्ही पैसे घेतलेच नाहीत, त्यामुळे द्यायचा प्रश्न येत नाही. |

११. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी मी आणि माझी सुन रत्ना सोबत न्यायालयात आलो आहोत. हे म्हणणे खरे आहे की, माझी सुन पुरावा देण्यासाठी न्यायालयात आली होती तेव्हा मी सोबत आली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझी सुन न्यायालयात येत असताना मी तिला एकटीला पाठवित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी सुन जितक्यावेळी न्यायालयात आली त्यावेळी मी तिच्यासोबत आले होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी रत्नाचा पुरावा न्यायालयात नोंदविला गेला त्या दिवशी मी न्यायालयात आले होते. माझी सुन रत्ना हि मला माझ्या मुली सारखी आहे.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुमच्या सुनेचा पुरावा नोंदणी न्यायालयात चालू असताना तुम्ही न्यायकक्षाच्या दरवाज्यावर उभ्या होत्या ? |
| **उत्तरः** | नाही, मी न्यायकक्षाच्या बाहेर बसलेले होते. |

१२. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी रत्नाचा पुरावा न्यायायलात नोंदविला गेला त्या दिवशी आम्ही सोबतच न्यायालयात आलो आणि सोबतच घरी गेलो.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुमच्या सुनेचा पुरावा नोंदविल्यावर घरी गेल्यानंतर न्यायालयात काय झाले या विषयी तुम्ही रत्नाला विचारले होते का ? |
| **उत्तरः** | मी तिला काहीही विचारले नाही. |
| **प्रश्न :** | तुमच्या सुनेला माणसांच्या गोदरीत संडासला जाण्याची सवय होती काय ? |
| **उत्तरः** | नाही. |
| **प्रश्न :** | तुमच्या सुनेला आजपर्यंत माणसांच्या गोदरीत जायचे काही काम पडले का ? |
| **उत्तरः** | नाही, माणसांच्या गोदरीत कशाला जाईल ती. |

१३. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी न्यायालयात आल्यानंतर पोलीसांनी मला माझे बयाण समजावून सांगितले होते.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | आरोपीने तुम्हाला रु.१५,०००/– दिले असते आणि घेतलेले रु.२५,०००/– परत मागितले नसते तर तुम्ही केस मागे घेतली असती ? |
| **उत्तरः** | हे सगळं खोटं आहे, आम्ही त्याला कोणतेही पैसे मागितले नाही, त्यामुळे पैसे देण्याचा प्रश्न येत नाही. |
| **प्रश्न :** | आज रोजी न्यायालयात येताना तुमच्या सुनेसोबत तुमची पुरावा देण्याविषयी चर्चा झाली असेल ना ? |

| | |
|---|---|
| **उत्तरः** | नाही, आमची कोणतीही चर्चा झाली नाही. |

१४. गावातील पोलीस पाटील, सरपंच तसेच घराच्या शेजारचे यांनी आम्हाला सदर घटनेविषयी आजपर्यंत कोणतीही विचारणा केली नाही.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | आज जर तुम्हाला कोर्टासमोर पैसे दिले तर तुम्ही केस मागे घेणार का ? |
| **उत्तरः** | पैसे देण्या घेण्याविषयी सदर साक्षीदाराला आरोपीच्या विधीज्ञांनी यापुर्वी २–३ वेळा प्रश्न विचारले असून सदर साक्षीदार प्रत्येकवेळी शपथ घेवून सांगत आहे की, आम्ही आरोपीकडे कोणतेही पैसे मागितले नाहीत, आरोपीने आम्हाला कोणतेही पैसे दिलेले नाहीत, त्यामुळे पैसे देण्या घेण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. साक्षीदार वारंवार सांगत आहे की, पैसे दिले आणि मागितले हे सर्व खोटे आहे. |

१५. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासादरम्यान आरोपीविरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, खोटा पुरावा देत आहे.

उलटतपास सायंकाळी ०४.३८ वाजता पूर्ण.

---

सायंकाळी ४.३८ ते ०५.०५ या कालावधी दरम्यान अभियोग पक्षाने फेरतपास करण्यासाठी त्यांचे म्हणणे पुरसीस द्वारे अभिलेखावर सादर करावे असे आरोपी पक्षाचे म्हणणे असल्यामुळे सरकारी वकील आणि आरोपीचे वकील यांनी वेळ मागितल्यामुळे तसा वेळ देण्यात आला होता.

---

**अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराची फेरतपासणी घेण्यासाठी खालील मुद्दावर सायंकाळी ०५.०५ मिनीटांनी परवानगी मागण्यात आली.**

भारतीय साक्ष अधिनियम २०२३ कलम १४३(३) प्रमाणे उलटतपासा दरम्यान परिच्छेद क्र.४ मधील <u>हे म्हणणे खरे आहे की, आम्ही ज्यावेळेस पोलीस स्टेशनला गेलो होतो, त्यावेळी आरोपी रामदास पोलीस स्टेशनमध्ये कोंडलेला होता. मी स्वतःहुन सांगते की, त्याच्या हाताला दोरी बांधलेली होती,</u> असा प्रश्न विचारल्यामुळे साक्षीदार आणि त्यांची सुन ही पोलीस स्टेशनला जाण्यापुर्वीच आरोपी तेथे कोंडलेला होता, परंतु साक्षीदार आणि त्यांची सुन एकापेक्षा अधिक वेळा पोलीस स्टेशनला गेल्या होत्या त्यामुळे योग्य ती परिस्थिती अभिलेखावर आणण्यासाठी सदर साक्षीदाराची फेरतपासणी करणे आवश्यक असल्यामुळे अशी परवानगी देण्यात यावी <u>अशी विनंती अभियोग पक्षातर्फे करण्यात आली आहे.</u>

सदर फेरतपासणी घेण्यासाठी आरोपीची विधीज्ञ श्री पी. आर. पटोकार यांनी अशी हरकत घेतली की, सदर गुन्ह्याच्या संपुर्ण तपासादरम्यान तसेच दोषारोप पत्राचे अवलोकन केले असता तसेच साक्षीदार क्र.२ यांचा आज रोजी न्यायालयासमोर झालेला सरतपास विचारात घेतला असता कुठेही साक्षीदार हे एका पेक्षा जास्त वेळ पोलीस स्टेशनला गेले होते, ही बाब नमुद केलेली नाही. त्यामुळे सरकारी अभियोक्ता सदर बाब यांना कोणत्या माध्यमातून माहिती पडली हे आश्चर्यकारक आहे तसेच एखाद्या बाबतीत संग्धीगता निर्माण झाल्यास किंवा एखाद्या गोष्टीस साक्षीदार दोन वेगवेगळ्या नावाने संबोधित करीत असल्यास ती बाब निश्चित करण्याकरीताच केवळ फेरतपास करण्याची संधी अभियोग पक्षास दिली जावू शकते. साक्षीदाराच्या तोंडून नवीन बाब अभिलेखावर आणणे ही आरोपीच्या विधीज्ञांची उलटतपासणी करण्याची कला आहे, अशा प्रत्येक आलेल्या नवीन बाबीला जर पुन्हा फेरतपासणी करण्याची संधी दिली तर आरोपीच्या विरुध्द तो अन्याय होईल. त्यामुळे आरोपी विरुध्द निःपक्षपातीप्रमाणे खटला चालविण्यासाठी अभियोग पक्षाने फेरतपास घेण्यासाठी केलेली विनंती नामंजुर करण्यात यावी, अशी विनंती आरोपी पक्षातर्फे करण्यात आली.

**आदेशः–** भारतीय साक्ष अधिनियम २०२३ कलम १४३(३) मध्ये असे नमुद केलेले आहे की, The re–examination shall be directed to the explanation of matters referred to in cross–examination and, if new matter is, by permission of the Court, introduced in re–examination, the adverse party may further cross–examine upon that matter. सदर तरतूदीचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, उलटतपासणी दरम्यान कोणतीही संदिग्धता निर्माण झालेली असल्यास किंवा शंका निर्माण झालेली असल्यास त्याचे योग्य ते स्पष्टीकरण अभिलेखावर आणण्यासाठी अभियोग पक्षास संधी देणे आवश्यक आहे तसेच सदर फेरतपासा दरम्यान कोणतीही नवीन बाब अभिलेखावर आल्यास त्या मजकूरा पुरती मर्यादित उलटतपास करण्याची संधी आरोपी पक्षास देणे आवश्यक आहे. सबब, सदर तरतूदी नुसार अभियोग पक्षास फेरतपासणी करण्याची परवानगी देण्यात येत आहे. तसेच फेरतपासणी पुरती मर्यादित उलटतपासणी करण्याची परवानगी आरोपी पक्षास देण्यात येत आहे.

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचे मार्फत फेरतपास सायंकाळी ०५.२० वाजता सुरुः**

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुम्ही उलटतपासणीमध्ये सांगितल्याप्रमाणे "ज्यावेळेस तुम्ही पोलीस स्टेशनला गेलो होतो, त्यावेळी आरोपी रामदास पोलीस स्टेशनमध्ये कोंडलेला होता आणि त्याच्या हाताला दोरी बांधलेली होती,'' हे तुम्ही कोणत्या दिवशी आणि कोणत्या तारखेला पाहिले होते ? |
| **उत्तरः** | आम्ही रिपोर्ट दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा पोलीस स्टेशनला गेलो होतो, त्यावेळी आरोपी पोलीस स्टेशनला कोंडला असल्याचे आणि त्याच्या हाताला दोरी बांधली असल्याचे आम्ही पाहिले होते. |

**<u>फेरतपासणीवर उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. आर. पटोकार यांचे मार्फत सुरुः</u>**

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुम्हाला रिपोर्ट दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी पोलीस स्टेशनला जाण्याची गरज का पडली ? |
| **उत्तरः** | रिपोर्ट द्यायला गेलो होतो त्यावेळी चिफ साहेब (ठाणेदार) हजर नव्हते, त्यामुळे दुसऱ्या दिवशी पोलीस स्टेशनला गेलो होतो. |

१६ हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला रिपोर्ट द्यायला गेलो होतो त्या दिवशी चिफ साहेब हजर नाहीत, असे पोलीस स्टेशनमधील दुसऱ्या पोलीसाने सांगितले होते. कोणत्या पोलीसाने मला दुसऱ्या येण्यास सांगितले होते, हे आज रोजी मला आठवत नाही. दुसऱ्या दिवशी किती वाजता मी पोलीस स्टेशनला गेले होते, ती निश्चित वेळ मला आठवत नाही. सकाळ–दुपार–संध्याकाळ यापैकी कोणत्या वेळेत दुसऱ्या दिवशी पोलीस स्टेशनला गेले होते, हे मला निश्चित आठवत नाही. मला विसरण्याचा कोणताही आजार नाही.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | दुसऱ्या दिवशी तुम्ही पोलीस स्टेशनला गेल्या होत्या त्यावेळी तुमचे बयाण नोंदविले असेल ना ? |
| **उत्तरः** | माझे नाही सुनेचे बयाण नोंदविले होते. |
| **प्रश्न :** | दुसऱ्या दिवशी तुम्ही पोलीस स्टेशनमध्ये गेल्या तेव्हा पोलीसांनी तुमच्याकडे कोणतीही चौकशी केली नाही का ? |
| **उत्तरः** | पोलीसांनी फक्त माझ्या सुनेकडे चौकशी केली होती. |

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | पोलीस स्टेशन मध्ये गेल्यावर तुम्ही कोणत्याही पोलीस सोबत बोलल्या नाही का किंवा कोणताही पोलीस तुमच्याशी बोलला नाही का ? |
| **उत्तरः** | मी बाहेर बसले होते. |
| **प्रश्न :** | पोलीसांनी तुमची चौकशी कोठे आणि केव्हा केली ? |
| **उत्तरः** | पोलीस आमच्या गावामध्ये आले होते, त्यावेळी माझ्याकडे चौकशी केली होती. |
| **प्रश्न :** | पोलीस तुमच्या गावामध्ये चौकशीसाठी कधी आले होते ? |
| **उत्तरः** | रिपोर्ट दिल्यानंतर २ ते ४ दिवसांनी आले होते. |

हे म्हणणे खरे नाही की, फेरतपासणी दरम्यान आरोपी विरुध्द कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितल्या आहेत.

दुपारच्या सत्रात दुपारी ०३.५० वाजता पासून आरोपी न्यायालयासमोर पुराव्या दरम्यान हजर होता.

उलटतपास सायंकाळी ०५.४० वा. पुर्ण

**दिनांकः– २१.०१.२०२५**

**समक्ष**

**(विष्णु द. गिते)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2025.01.21 18:39:56 +0530

**(विष्णु द. गिते)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>बाळापूर |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | २१/०१/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | २१/०१/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | २१/०१/२०२५ |